# प्रा. कहांडळ यांच्या शोधनिबंधास पुरस्कार

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ६ : के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था आणि दक्षिण कोरियातील सुंगक्युन्कवान विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामंजस्य करारा अंतर्गत के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेच्या ॲप्लाइड सायन्स विभागातील चार प्राध्यापकांनी दक्षिण कोरियातील सुंगक्युन्कवान विद्यापीठ येथे ''ॲडव्हान्स मटेरिअल्स सिनथेसिस कॅरॅक्टरायझेशन अँण्ड ॲप्लिकेशन'' या पाचव्या आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंध सादर केले. त्यापैकी प्रा. सुमन कहांडळ यांच्या शोधनिबंधास 'सर्वोत्तम शोधनिबंध' सन्मानित करण्यात आले.



**दक्षिण कोरिया :** विद्यापीठात सर्वोत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार स्वीकारताना के. के. वाघ अभियांत्रिकीच्या प्रा. सुमन कहांडळ.

परिषदेत प्रा. डॉ. ज्ञानेश्वरी पाटील, प्रा. सुमन कहांडळ, प्रा. रामेश्वर तुपके आणि प्रा. ईशान इंगळे यांनी सहभाग घेत शोधनिबंध सादर केले.

विशेष बाब म्हणजे, प्रा. कहांडळ यांनी त्यांच्या 'इलेक्ट्रोकेमिकली सिन्थेसाइज्ड निकेल सेलेनाईड थिन फिल्म फॉर ओव्हरऑल इलेक्ट्रो कॅटॅलिटिक वॉटर स्प्लिटिंग अप्लिकेशन' या शोधनिबंधासाठी सर्वोत्तम शोधनिबंध म्हणून सन्मानित करण्यात आले. या शोधनिबंधासाठी डॉ. रवींद्र बुलाखे व डॉ. अनुराधा पवार यांचे मार्गदर्शन लाभले. या सन्मानाने ''ॲडव्हान्स्ड मटेरियल्स & सस्टेनेबल एनर्जी'' क्षेत्रातील संस्थेचे संशोधन योगदान अधोरेखित झाले आहे. सामंजस्य करारामुळे शैक्षणिक सहकार्य, संशोधन देवाण-घेवाण आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी नवनवीन संधी उपलब्ध झाल्याचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी सांगितले.

प्रा. कहांडळ यांच्या यशाबद्दल अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त अशोक मर्चंट, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी व प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी अभिनंदन केले.



Sakal 07/08/2025